भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500

FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये

सत्यमेव जयते

Rs. 500

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2024 ◐ DF 113937

कोषागार कार्यालय, ठाणे
20 MAR 2025
लिपीक

ठाणे

# //करारनामा//

हा करारनामा दि. 03.04.2025 रोजी करण्यात येत आहे. हा करारनामा मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने श्री. प्रसाद शिंगटे - मा.उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) सो॥. मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), जि. ठाणे, पिन कोड — 401101. यांच्यामार्फत त्यांच्या पुढील म्हणजेच या प्रकरणी प्रथम पक्षीय (संदर्भाखेरीज) इतरत्र उल्लेख म्हणून केला जाईल.

मे. S-Way Computer, Address - 144, ओस्वाल शॉपिंग सेंटर, जेसल पार्क, भाईंदर (पू.), ठाणे — 401105. यांना द्वितीय पक्ष म्हणून संबोधण्यात येईल. यांमध्ये करारनामा होत आहे.

ज्या अर्थी, मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्यालयातील LED स्क्रीन चालू करणेकामी कंत्राटदार यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

त्या अर्थी, मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्यालयातील LED स्क्रीन चालू करणेकामी मागविण्यात आलेल्या दरपत्रकाच्या दरास मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा. आयुक्त तथा प्रशासक सो. यांनी दि. 26/03/2025 रोजी मान्यता दिलेली आहे.

ज्या अर्थी, द्वितीय पक्षीय यांनी सदरचे काम करणेबाबत त्यांच्या दरानूसार पुरवठा करणेस संमती दर्शविलेली आहे. सदरचा प्रस्ताव Annexure — A म्हणून संबोधण्यात येत आहे.

Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner

249505

2 8 MAR 2025

## ओळखपत्र - २

मुद्रांक विक्री नोंदवही अनुक्रमांक.............................. दिनांक ..........................

दस्ताचा प्रकार .............................. दस्त नोंदणी करणार आहे का? होय/नाही.

मिळकतीचे थोडक्यात वर्णन ..............................................................

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव - ..............................................................

हस्ते असल्यास त्यांचे नांव ..............................................................

पत्ता - ..............................................................सही ..........................

दुसऱ्या पक्षकाराचे नांव .............................. मुद्रांक शुल्क रक्कम ..........................

मुद्रांक विक्रेत्याची सही (श्री. वामन भोईर) ..............................................................

मुद्रांक विक्रीचे ठिकाण/पत्ता - श्री समर्थ कृपा, ८/२९, भाईदर शॉपिंग सेंटर, भाईदर (प.) ४०१ १०१, मुद्रांक परवाना क्र. १२०१०४९

S. WAY COMPUTERS Mumbai

2 8 MAR 2025

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासुन ६ महिन्यात वापरनं बंधनकारक आहे.

Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner

त्या अर्थी, प्रथम पक्षीय यांनी दिलेल्या प्रस्तावाचा आणि कामाच्या तपशीलाचा विचार करून द्वितीय पक्षीय यांनी सदर कामाकरीता दिलेलया संमतीनूसार मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या दि. 26/03/2025 रोजीच्या मंजूरी अन्वये द्वितीय पक्षीय यांना खालील अटीशर्तीच्या अधिन राहून दि. 03.04.2025 पासून ते दि. 02.04.2026 (12 महिन्यांकरीता) पर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्यालयातील LED स्क्रीन चालू करणेकामी करारनामा करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सदर कराराच्या अटी व शर्ती उभय पक्षीय यांना बंधनकारक आहेत.

- या कराराच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१. द्वितीय पक्षीय यांनी शुल्क भरण्याकरीता Annexure – A मध्ये नमूद केल्यानूसार शुल्क भरणा महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या अटी शर्तीनूसार करण्याचे मान्य केले आहे.

२. सदर कामाकरीता लागणारा आवश्यक तो कर्मचारी वर्ग यांची व्यवस्था द्वितीय पक्षीय यांनी करावयाची आहे.

३. सदर शुल्क भरण्यासाठी रक्कम, साहित्य पुरवण्याची जबाबदारी किंवा कोणत्याही प्रकारची मशिनरी अथवा वाहन पुरवण्याच जबाबदारी द्वितीय पक्षीय यांची राहिल.

४. सदर कामासाठी द्वितीय पक्षीय यांनी महानगरपालिकेस सुरक्षा अनामत रक्कम देण्याचे मान्य केले आहे. सदरची सुरक्षा अनामत रक्कम द्वितीय पक्षीय यांनी द्यावयाच्या देयकाच्या 5 टक्केच्या दराने बँक गॅरंटी च्या स्वरूपात सदरचा करारनामा झाल्यापासून तीन दिवसात प्रथम पक्षीय यांच्याकडे जमा करण्याचे द्वितीय पक्षीय यांनी मान्य केले आहे. सदरची सुरक्षा अनामत रक्कम भरणा केलेल्या वार्षिक शुल्काचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर द्विवतीय पक्षीय यांच्या मागणीनूसार परतावा करण्यात येईल. परंतू द्वितीय पक्षीय यांना कराराप्रमाणे काम पूर्ण न केल्यास सदरची अनामत रक्कम कोणतीही सूचना न देता जप्त करण्यात येईल.

५. सदर सुरक्षा अनामत रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज मागण्याचे अधिकार द्वितीय पक्षीय यांना राहणार नाहीत.

६. द्वितीय पक्षीय यांनी सदरची बँक गॅरंटी मुदतीत जमा न केल्यास द्वितीय पक्षीय यांच्या देयकातून उपरोक्त बँक गॅरंटीची रक्कम कपात करून अंतिम देयक अदा केले जाईल असे द्वितीय पक्षीय यांनी मान्य केलेले आहे.

७. द्वितीय पक्षीय यांनी सदर कामाचे कार्यादेश प्राप्त झाल्यापासून कामाचे लेखी देयक (Bill) मासिक किंवा त्रैमासिक स्वरूपात मिरा भाईंदर महानगरपालिकेस सादर करावे.

८. अट क्र. 07 अन्वये द्वितीय पक्षीय यांनी सादर केलेले लेखी देयक (Bill), मासिक किंवा त्रैमासिक स्वरूपात प्रथम पक्षीय यांच्याकडून द्वितीय पक्षीय यांना अदा करण्यात येईल. प्रथम पक्षीय यांच्याकडून अदा करण्यात येणा-या देयकामधून नियमाप्रमाणे देय असलेले सर्व करांचा समावेश करून देयक अदा करण्यात येईल.

९. द्वितीय पक्षीय केलेल्या कामाच्या गुणवत्ता, दर्जा, मापे, परिणाम व तांत्रिक समस्या किंवा अडचण याबाबत काहीही तक्रार उदभवल्यास त्याबावत तक्रार दुर करण्याची जबाबदारी द्वितीय पक्षीय यांची राहील.

Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner

१०. द्वितीय पक्षीय यांनी महानगरपालिकेने ठरविलेल्या कार्यादेशातील नमुद मुदतीत काम करण्याचे मान्य केले आहे. परंतु द्वितीय पक्षीय यांनी काम न केल्यास महानगरपालिका इतर कोणत्याही ठेकेदाराकडून काम पुर्ण करून सदर कामासाठी होणारा जादा आकार द्वितीय यांच्या जमा केलेल्या सुरक्षा अनामत रक्कमेमधून वसूल करण्यात येईल.

११. या करारामुळे कुठल्याही स्वरूपाची मिरा भाईंदर महानगरपालिकेस क्षती झाल्यास द्वितीय पक्षीय क्षतीपुर्तीची हमी देत आहे.

१२. द्वितीय पक्षीय यांनी त्यांना दिलेले काम करण्यास खंडीत केले किंवा करारनाम्यातील अटीशर्तीचा भंग केल्यास द्वितीय पक्षीय यांच्या सबोत केलेला करारनामा रद्द करून द्वितीय पक्षीय यांनी जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्याचा अधिकार प्रथम पक्षीय यांच्याकडे राहील.

१३. द्वितीय पक्षीय यांनी त्यांना नेमून दिलेले शुल्क भरणा करण्याचे काम पुर्ण केल्यानंतर ठरवून दिलेल्या मंजूर दरानूसार (Annexure - A) योग्य ते लेखी बिल महानगरपालिकेस सादर करतील. प्रथम पक्षीय, सदर बिलाची रक्कम द्वितीय पक्षीय यांना देऊ करतील. द्वितीय पक्षीय यांनी वार्षिक शुल्क भरण्याच्या कामाचे देण्यात येणा-या देयकामध्ये नियमाप्रमाणे देय असलेले सर्व कर समाविष्ठ आहे. सर्व शासकीय कर, वॅट प्रॉव्हीडन्ड फन्ड, किमान वेतन आयोगानूसार वेतन अन्य कर भरण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१४. द्वितीय पक्षीय यांना दिलेले काम व वार्षिक शुल्क भरण्याचे काम उप ठेकेदारस देता येणार नाही.

१५. कारारातील अटी आणि शर्तीमुळे तसेच सदोष कामामुळे वित्तीय व कायदेशीर प्रश्न निमार्ण झाल्यास त्याची जबाबदारी द्वितीय पक्षीय यांची राहील.

१६. मुंबई मुद्रांक शुल्क कायदा अन्वये सदर करारनाम्यासाठी योग्य ते मुद्रांक शुल्क (Stamp Duty) भरण्याची जबाबदारी द्वितीय पक्षीय यांची राहील.

१७. यूजर आयडी (ID) तयार करण्याची जावाबदारी ठेकेदाराची राहील.

१८. सदर करारनाम्याची मुदत दि. 3.04.2025 पासून ते दि. 02.04.2026 या कालावधीसाठी राहील.

१९. सदर यंत्रणा कार्यान्वित झाल्यानंतर सदर यंत्रणा चालविण्याचे प्रशिक्षण विनामुल्य महानगरपालिकेने निश्चित केलेल्या कर्मचा-यांना देण्याची जबाबदारी द्वितीय पक्षीय यांची राहील.

२०. द्वितीय पक्षीय यांनी सदर कामाचे देय रक्कम अदा करण्यासाठी प्रथम पक्षीय म्हणजेच माहिती व जनसंपर्क विभाग यांच्याकडे देयक जमा करतेवेळी काम पुर्ण केल्याच्या तपशीलासह जमा करावी.

२१. दरपत्रक स्विकृतीनंतर कार्यादेशात नमुद अटी व शर्ती तसेच प्राप्त सुचनेनुसार वार्षिक शुल्क भरण्याची कार्यवाही करावी लागेल.

२२. मंजुर दरपत्रकधारकास तात्काळ विहित रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर स्वखर्चाने कारनामा करून द्यावा लागेल.

Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner

२३. मंजूर केलेल्या कामाच्या रक्कमेचा 5 टक्के सुरक्ष अनामत रक्कम भरावी लागेल. सदर रक्कमेतून भरलेली इसारा रक्कम वळती करून घेण्यात येईल. इसारा रक्कमेवर/सुरक्षा अनामत रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

२४. दरपत्रकधारकाने आपले दर सर्व करासह देणे आवश्यक आहे. दरपत्रकाची कुठलीही अट स्वीकारण्यात येणार नाही अथवा दरपत्रक दरापेक्षा जास्त दर दिला जाणार नाही.

२५. दरपत्रकातील दर दरपत्रक उघडल्यापासून 120 दिवसांसाठी ग्राह्य धरण्यात येतील.

२६. कोणतेही दरपत्रक संपुर्णत: किंवा अंशत: कोणतेही कारण न देता स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अधिकार मा. आयुक्त सो. यांनी राखुन ठेवले आहेत.

२७. कोणत्याही कारणामुळे महापालिका व निविदाकार यांच्यात वाद निर्माण झाल्यास मा. आयुक्त सो. लवाद म्हणून काम पाहतील व त्यांचा निर्णय निविदाकारवर बंधनकारक असेल.

२८. दरपत्रकात नमुद केलेले एकुण परिमाण अंदाजे दिलेले असून त्यात वाढ/घट होण्याची शक्यता आहे. तथापि मंजूर दरानेच सेवा पुरवावी लागेल. त्याकरीता वाढीव दराची मागणी करता येणार नाही.

२९. दरपत्रकधारकाने दरपत्रकातील वरीलप्रमाणे सर्व घटकांचे दर सादर करणे आवश्यक आहे. सर्व घटकांचे दर न सादर करणा-या दरपत्रकधारकाचे दरपत्रक ग्राह्य धरली जाणार नाही.

वरील सर्व अटी व शर्ती उभय पक्षीय यांना मान्य असून त्याकरीता उभयपणे सह्या करण्यात येत आहेत. सदर करारनामा आज दि.  रोजी चांगल्या मन:स्थितीत (Sound minded) करण्यात आला आहे.

**प्रथम पक्षीय:-**
**श्री. प्रसाद शिंगटे.**
**मा. उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) सो.**
**मिरा भाईंदर महानगरपालिका.**

**द्वितीय पक्षीय:-**
**मे. S-Way Computer,**
**Address - 144, ओस्वाल शॉपिंग सेंटर,**
**जेसल पार्क, भाईंदर (पू.), ठाणे — 401105.**

Scanned with CamScanner
Scanned with OKEN Scanner

# Annexure – A

| Sr. no. | Description | Qty | मे. S-Way Computer |
|---|---|---|---|
| 1 | 55" LG Ultra 4K Digital Signage Commercial Display 55UH5C AMC for year. | 1 | 51000/- |
| 2 | 65" LG Ultra 4K Digital Signage Commercial Display 65UH5C AMC for year. | 1 | 61000/- |
| 3 | Cloud base content Manger Software with Digital Signage Network media player (Quad Core Processor/2GB Ram/8GB | 2 | 36000/- |
| 4 | Cloud base content Manager software AMC for 1 year. | 2 | 36000/- |
| | Total (18% GST सह) | | 217120/- |

Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.
दूरध्वनी: 022-28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 28145985
ईमेल: mbmcho@gmail.com वेबसाईट: www. mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय**

जा. क्र. मिभा / मनपा / भोवज / ०७/२०२५-२६ दिनांक: ०३/०४/२०२५

**//कार्यादेश//**

प्रति,
मे. S-Way Computer.
144, ओस्वाल शॉपिंग सेंटर,
जेसल पार्क, भाईंदर (पू.),
ठाणे — 401105.

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्यालयातील LED स्क्रीन चालू करणेकामी
**(कालावधी :- दि. 03.04.2025 पासून 12 महिन्यांकरीता)**

संदर्भ :- 1. दि. 13/02/2025 रोजीची निविदा सूचना.
2. दि. 26/03/2025 रोजी मा. आयुक्त तथा प्रशासक सो. यांनी दिलेली मान्यता.
3. दि. 3.04.2025 रोजीचा करारनामा.

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्यालयातील LED स्क्रीन चालू करणेकामी मा.आयुक्त तथा प्रशासक सो. यांच्या दि. 26/03/2025 रोजीच्या मंजुरी अन्वये उक्त कामाकरीता संदर्भ क्र. 03 अन्वये करण्यात आलेला आहे. या करारनामाच्या अटी व शर्तीस अधीन राहून दि. 03.04.2025 ते दि. 02.04.2026 या कालावधीपर्यंत Annexure — A मधील कामाकरीता कार्यादेश प्रदान करण्यात येत आहे.

**Annexure — A**

| Sr. no. | Description | Qty | मे. S-Way Computer |
|---|---|---|---|
| 1 | 55" LG Ultra 4K Digital Signage Commercial Display 55UH5C AMC for year. | 1 | 51000/- |
| 2 | 65" LG Ultra 4K Digital Signage Commercial Display 65UH5C AMC for year. | 1 | 61000/- |
| 3 | Cloud base content Manger Software with Digital Signage Network media player (Quad Core Processor/2GB Ram/8GB Flash) AMC for 1 year. | 2 | 36000/- |
| 4 | Cloud base content Manager software AMC for 1 year. | 2 | 36000/- |
| Total (18% GST सह) | | | 217120/- |

वरीलप्रमाणे सेवा माहिती व जनसंपर्क विभाग आणि माहिती व तंत्रज्ञान विभागाशी संपर्क साधुन पुरवठा करण्यात यावी.

श्री. प्रसाद शिंगटे.
उपायुक्त (माहिती व जनसंपर्क)
मिरा भाईंदर महानगरपालिका



Scanned with CamScanner
Scanned with OKEN Scanner